WHO च्या New Child Growth Standards प्रमाणे अंगणवाडी केंद्रातील बालकांच्या वाढीचे संनियंत्रण करणेसाठी अंगणवाडी केंद्रांना EPGM Machines पुरविण्यासाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजना आणि एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना या योजनेअंतर्गत तरतूदीतून खरेदी करण्यास मंजूरी देणेबाबत

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र.एबावि-२०१५/प्र.क्र.६८/का.६
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १३ फेब्रुवारी, २०१५

<u>वाचा</u> :- आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचे पत्र जा.क्र. मबाविआ/एबाविसेयो/का-४/२५९/२०१५, दिनांक ०४.०२.२०१५

<u>प्रस्तावना</u> :- सन २०१४-१५ या चालू आर्थिक वर्षापासून केंद्र शासनाने मंजूर केलेली एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना ही नवीन योजना २० जिल्हयांसाठी लागू करण्यात आलेली आहे. यामध्ये ग्रामीण क्षेत्रातील १८८ प्रकल्प, आदिवासी क्षेत्रातील ६३ प्रकल्प व नागरी क्षेत्रातील ६६ प्रकल्प अशा एकूण ३१७ प्रकल्पांसाठी योजना लागू करण्यात आलेली आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना या योजनेअंतर्गत मान्य व उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून प्रति वजनकाटे करीता रु.५,०००/- तसेच एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमधील ८ पैसे तरतूदीमधून उर्वरीत रु.३८२०/- प्रति वजनकाटा या बाबीअंतर्गत अनुदान उपलब्ध आहे. या तरतूदीतून ग्रामीण प्रकल्पातील ७८५२ अंगणवाडी केंद्राकरीता प्रति अंगणवाडी केंद्र १ नग EPGM मशीन प्रति नग किंमत रुपये ८,८२०/- (VAT सह) याप्रमाणे एकूण ७८५२ EPGM मशिन खरेदी करुन पुरवठा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u> :- एकात्मिक बाल विकास सेवा योजना व एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना या योजनेअंतर्गत ग्रामीण प्रकल्पातील ७८५२ अंगणवाडी केंद्राकरीता प्रति अंगणवाडी केंद्र १ नग EPGM मशीन प्रति नग किंमत रुपये ८,८२०/-(VAT सह) याप्रमाणे (१) M/S SAI HI-TECH Products, ३५३, Manjari Budruk, Tal Haveli, District Pune (२) Nitiraj Engeneers P Ltd, Behind Gurudwara, Mumbai Agra Road, Dhule यांचेकडून प्रत्येकी ३९२६ EPGM मशिन प्रति केंद्र १ नग प्रमाणे एकूण ७८५२ EPGM मशिन खरेदी करण्यासाठी एकूण रु.६,९२,५४,६४०/- इतक्या रक्कमेस खालीलप्रमाणे पुरवठा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | दरकरार धारकाचे नांव | Specification | दरकरार | दरकरावरील दर | कमाल रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | M/S SAI HI-TECH Products, ३५३, Manjari Budruk, Tal Haveli, District Pune | Electronic Physiogrowth Monitor for Child/ Infant Discription :- Weighting Capacity, Kg: upto 25, Least Count, g:5, Ht/Length,cm, Manual | Director General of Supplies & Disposals, Govt of India यांचे Rate Contract DGS&D, चेन्नई | Price Per Unit - Rs.7840/- + Rs.980/- (Vat-12.5%) Total Cost Rs.8820 per Unit | रु.३,४६,२७,३२०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | चे दरकरार क्रमांक EPGM/CH-२/RC-CC०२००००/०३१५/२५९/NC०४३/०९६, दिनांक १६ सप्टेंबर, २०१४ अन्वये दरकरार झालेला असून सदर दरकरार दिनांक ३०.०९.२०१५ पर्यंत ग्राहय आहेत. Director General of Supplies & Disposals, Govt of India यांचे Rate Contract DGS&D, चेन्नई चे amendment No. EPGM/CH-२/RC-CC०२००००/०३१५/२५९/NC०४३/०९६/५२४०८, दिनांक २९ सप्टेंबर, २०१४ | | |
| २ | Nitiraj Engeneers P Ltd, Behind Gurudwara, Mumbai Agra Road, Dhule | PHOENIX/CGMS, Store Description - Electronic Physiogrowth Monitor for child /Infant Weighting Capacity, Kg : upto 25, Least Count g:5, Ht/Length,cm: Manual, | Director General of Supplies & Disposals, Govt of India यांचे Rate Contract DGS&D, चेन्नई चे दरकरार क्रमांक EPGM/CH-२/RC-CC०२००००/०३१५/२५९/ | Price Per Unit - Rs.7840/- + Rs.980/- (Vat-12.5%) Total Cost Rs.8820 per Unit | रु.३,४६,२७,३२०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | NB०७१/०९७, दिनांक १६ सप्टेंबर, २०१४ अन्वये दरकरार झालेला असून सदर दरकरार दिनांक ०४.०८.२०१५ पर्यंत ग्राहय आहेत. | | |
| | | | एकूण | | रु.६,९२,५४,६४०/- |

२. यासंदर्भातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.

१) सदर दोन्ही मशिनचे IIT (भारतीय तंत्रज्ञान संस्था) कडून मुल्यमापन करुन घेणे आवश्यक राहील.

२) मशीन व्यवस्थित काम करतात याविषयी सतत पाठपुरावा करावा.

३) "Electronic Physiogrowth Monitoring Machines" खरेदी करतांना दरकरारपत्रकातील अटी व शर्तीचे पालन तंतोतंत करावे. तसेच दरकरारपत्रात स्पष्ट केल्याप्रमाणे (Specefication प्रमाणे) पुरवठा केला जाईल याची दक्षता आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महा राष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी घ्यावी.

४) सदरचा निधी शासनाच्या विहित धोरणानुसार व कार्यपध्दतीनुसार खर्च करण्यात येईल.

५) पुरवठादाराने वरीलप्रमाणे वरील वस्तुंचा पुरवठा प्रकल्पस्तरा पर्यंत करावा. प्रकल्प स्तरावर साहित्य प्राप्त झाल्यानंतर ते संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी त्याच दिवशी पंचनामा करुन स्विकारावे व दुस-या दिवशी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) यांना कळवावे. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत साहित्य पुरवठा करण्यासंदर्भात शासन पत्र क्र.विपताप्र-२०११/प्र.क्र.५३३/का.६,दि.१७.०७.२०१२ मधील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

६) वरील वस्तूंचा पुरवठा उपलब्ध तरतूदीतून विहित पध्दतीचा अवलंब करुन करण्यात यावा. पुरवठादाराने मागणीप्रमाणे विहित प्रमाणात, विहित केलेल्या गुणवत्तेनुसार वरील वस्तूंचा प्रकल्प स्तरापर्यंत पुरवठा केला आहे. याबाबतची खात्री करण्यात यावी. तसेच सदर पुरवठा केलेल्या बाबीवर आयसीडीएसच्या वापरासाठी / शासनामार्फत पुरवठा असा शिक्का मारलेला किंवा लेबल लावलेला असावा. वरील वस्तूंचे वाटप / पुरवठा व खर्च यामध्ये अनियमितता झाल्यास व लेखा आक्षेप उद्भवल्यास त्याची जबाबदारी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांची राहील.

७) हया योजनेचा लाभ लाभार्थ्यांना पोहचावा, याद्दष्टीने स्वयंस्पष्ट माहिती अंगणवाडीतील नोंदवहीमध्ये उत्पादनाचा दिनांक / एकूण पुरवठा / एकूण उपयोग याबाबतची योग्य नोंद ठेवणे, इत्यादी बाबत उचित मार्गदर्शक सूचना आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी द्याव्यात.

८) सदर आदेशानुसार प्रत्यक्षात पुरवठा झालेला आहे, याची खात्री झाल्यावरच देयक अदा करण्यात यावे. यासाठी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई हे जबाबदार राहतील.

९) आपली अंगणवाडी हया मासिकात सदर पुरवठयाबाबत सविस्तर माहिती द्यावी.

३. यासाठी होणारा खर्च हा सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना या योजनेअंतर्गत मान्य व उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून प्रति वजनकाटे करीता रु.५,०००/- तसेच एकात्मिक बाल विकास सेवा योजनअंतर्गत ८ पैसे तरतूदीमधून उर्वरीत

रु.३८२०/- प्रति वजनकाटा या बाबीअंतर्गत खालील लेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या तरतूदीतून भागवून त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

ग्रामीण प्रकल्पांसाठी खर्च :- केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना यामध्ये प्रति वजनकाटे रु.५,०००/- तरतूद मंजूर केलेली आहे. सदर तरतूदीमधील खर्च भागविण्यासाठी उपलेखाशिर्ष

१) केंद्र शासनाचा ९०% हिस्सा - लेखाशिर्ष :- मागणी क्र.एक्स-१, मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, ०४ केंद्र पुरस्कृत योजना, (०४) (११) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना योजना (ग्रामीण) केंद्र हिस्सा ९०% (२२३६ १५९८) २१ सामुग्री व पुरवठा

२) राज्य शासनाचा १०% हिस्सा - लेखाशिर्ष :- मागणी क्र.एक्स-१, मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, ०४ केंद्र पुरस्कृत योजना, (०४) (१२) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना योजना (ग्रामीण) राज्य हिस्सा १०% (२२३६ १६०४) २१ सामुग्री व पुरवठा

एकात्मिक बाल विकास सेवा योजनअंतर्गत ८ पैसे अंतर्गत उपलब्ध तरतूदीअंतर्गत ग्रामीण प्रकल्पांसाठी खर्च भागविण्यासाठी उपलेखाशिर्ष

योजनेत्तर - लेखाशिर्ष :- मागणी क्र.एक्स-१, मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, (०३) जिल्हा परिषदांना अनुदान (०३) (०१) एकात्मिक बाल विकास सेवा योजना (मानधन व आहार खर्च) (२२३६ ००२७) १९ आहार खर्च, या लेखाशिर्षाखालील तरतूदीतून भागवून, त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

याकरिता आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना आहरण, संवितरण व नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ १११/व्यय-६, दिनांक ३०.०१.२०१५ व महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१२/प्र.क्र.४३६/का.६, दिनांक ११.०२.२०१५ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वि. बा. पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२ , मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
सहायक संचालक (वित्त व लेखा), एबाविसेयो, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
महिला व बाल विकास विभाग, कार्यासन क्र.४ (अर्थसंकल्प)
निवड नस्ती (कार्या.६)

निर्गमित
दिनांक: